# स्पर्धा परीक्षेसाठी अमरावती विद्यापीठातर्फे निःशुल्क मार्गदर्शन

## स्पर्धा परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या पुर्व परीक्षेसाठी प्रवेशाचे अर्ज सादर करण्याकरीता मुदतवाढ

दिनांक १३ नोव्हेबर २०२१ रोजी झालेल्या अमरावती बंद मधील तनावामुळे अमरावतीमध्ये कलम १४४ लागू करण्यात आलेली असल्यामुळे तसेच इंटरनेट सेवा बंद असल्याकारणाने प्रवेश अर्ज सादर करण्याकरीता १५ दिवसाची मुदतवाढ करण्यात आलेली आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत मागे राहू नये व त्याला स्पर्धा परीक्षेची इत्यंभूत माहिती मिळावी आणि रोजगार मिळावा, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने प्रवेश पुर्व परीक्षा आयोजीत करण्यात आलेली आहे.

विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग हे इतर मागासवर्गीय (Non Creamy Layer), अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्ग तसेच खुल्या गटातील (बी.पी.एल.) उमेदवारांसाठी निःशुल्क आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे राज्य कर निरीक्षक, असीस्टंट सेक्शन ऑफीसर व पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पूर्वपरीक्षा घेतली जाणार असून संपूर्ण महाराष्ट्रात वरील ६६६ पदांची भरती करण्यात येणार आहे कोणतेही पदवीधर ही परीक्षा देऊन नोकरी मिळवू शकतात तसेच सदर मार्गदर्शन वर्गातून एम.पी.एस.सी.,रेल्वे, बँक, स्टाफ सिलेक्शन कमिशन, एल.आय.सी. आदी विभागातील विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मुलांचे वसतीगृह रोड, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** या विभागात २२ नोव्हेंबर २०२१ ते ११ डिसेंबर २०२१ या कालावधीत दुपारी १२ ते ५ वाजे पर्यंत प्रवेशाचे अर्ज सादर करावेत. विद्यापीठाच्या मार्गदर्शन केंद्रातच वरील अर्ज उपलब्ध असून उमेदवारांनी स्वतः ओळखपत्र व २ पासपोर्टसाईझ फोटो आणणे अनिवार्य आहे. अर्ज केलेल्या उमेदवारांची निवड प्रवेश परीक्षेव्दारे केली जाणार आहे. सदर परीक्षेची तारीख व वेळ ही विद्यार्थ्यांना यशावकाश ई-मेल किंवा एस.एम.एस. व्दारे कळविण्यात येईल.

स्पर्धा मार्गदर्शन केंद्रा मधून आजवर अनेक विद्यार्थ्यांची विविध विभागात निवड झालेली आहे. या मार्गदर्शन वर्गाचा इच्छुक उमेदवारांनी लाभ घेण्याचे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील स्पर्धा परीक्षांचे समन्वयक प्राध्यापक डॉ. रंजना दिनकर राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०७२१-२५५३०१६ (Ext. 311),९७६६२८३१२४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे सूचित केलेले आहे.

Sd/-

**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती